चिकूPiku®
Fun & Learning



Pune, Vol.: 5, 2nd issue, March 2024 (Monthly), Price: 100/- Pages: 42

माझ्या बोटात जादू आहे बघा बघा बघा...

कविता - शोभा भागवत | चित्र - सानिका देशपांडे

माझ्या बोटात जादू आहे बघा बघा बघा
दोन हरणं मोठे डोळे उंच उभे कान
पापी घेतात एकमेकांची उड्या मारतात छान
टक्कर देतात गंमत करतात पळून जातात बघा
माझ्या बोटात जादू आहे बघा बघा बघा






एक मासा पाण्यात शिरतो वर–खाली पोहतो
इकडे जातो तिकडे जातो पंख हलवतो
मध्ये–मध्ये तोंड उघडून छोटे मासे खातो
माझ्या बोटात जादू आहे बघा बघा बघा



इकडे उडतं तिकडे उडतं फुलपाखरू बागडतं
उडत उडत हळू हळू माझ्याजवळ येतं
माझ्याच कुशीत त्याला झोपायचं असतं
माझ्या बोटात जादू आहे बघा बघा बघा





बोटं माझी राक्षसाची शिंगं कधी होतात
बोटं माझी राक्षसाचे सुळे कधी होतात
बोटं माझी श्रीकृष्णाची मुरली वाजवतात
माझ्या बोटात जादू आहे बघा बघा बघा

बोटं माझी धा धिं धिं धा तबला वाजवतात
बोटं माझी एक दोन तीन चार मोजतात
वरण भात पोळी भाजी मुटूमुटू खातात
माझ्या बोटात जादू आहे बघा बघा बघा





बोटं माझी कधी कधी वेडेपणा करतात
नाकात जातात तोंडात जातात ऐकत नाही म्हणतात
समजावून सांगितलं म्हणजे परत शहाणी होतात
माझ्या बोटात जादू आहे बघा बघा बघा

बोटं माझी तोंड मिटतात
वाईट बोलू नका

बोटं माझी कान झाकतात
वाईट ऐकू नका

बोटं माझी डोळे मिटतात
वाईट पाहू नका

माझ्या बोटात जादू आहे
बघा बघा बघा...

Musical Intelligence

अनेक मुलांचं बालपण आणि पालकांचं पालकत्व ज्यांनी आनंदाचं केलं अशा शोभा भागवत यांना हा अंक समर्पित करत आहोत.

प्रिय शोभाताई,

तुम्ही चिकूपिकूला, आम्हा सगळ्यांनाच खूप काही दिलंत. पालकांसाठीचे तुमचे सहजसंदेश मनाला किती भिडतात आणि पटतात. गरवारे बालभवन ही मुलांसाठी हक्काची जागा तुम्ही उभी केली. मुलं इथे मोकळेपणाने बागडतात, खेळतात. इथे त्यांच्यावर कुठलाही ताण नाही, अपेक्षा नाही. मुलांशी असं सहज कनेक्ट होणं काहीच जणांना जमतं. तुम्ही गोष्टी, गाणी, गप्पांमधून कोणत्याही मुलाला आपलंसं करून घ्यायचात. तुम्ही सांगायचात अशा काही खास गोष्टी या अंकातून देत आहोत. आई-बाबा मुलांना जवळ घेऊन त्या गोष्टी सांगतील तेव्हा मजा येईल. शोभाताई तुम्ही लिहिलेलं 'आपली मुलं' हे पुस्तक प्रत्येक पालकाने पुन्हा पुन्हा वाचण्याजोगं आहे. पालक म्हणून आपण काय करायला हवं हे किती सोप्या भाषेत लिहिलंय त्यात. शोभाताई, तुम्ही चिकूपिकूची मुख्य प्रेरणा होतात आणि यापुढेही कायम असाल. तुमच्या विचारांमधला काही अंश जरी आम्ही आत्मसात करू शकलो तर मुलांबरोबरचा प्रवास जास्त समृद्ध होईल हे नक्की. फक्त मुलांवरच नाही तर आपल्या लोकांवर, आपल्या कामावर आणि स्वतःवरही मनापासून प्रेम कसं करायचं हे तुम्ही दाखवलंत. तुम्हाला खूप खूप प्रेम.

- चिकूपिकू टीम



शोभा भागवत
२९ ऑगस्ट १९४७ - ८ डिसेंबर २०२३



पालकांना शोभाताई आवर्जून सांगायच्या...

जबाबदार पालक हा काय असतो?

तो प्रेमळ पालक असतो. डॉक्टर असतो. शिक्षक असतो. बालमानसशास्त्रज्ञ असतो. आहारतज्ज्ञ असतो. खेळाडू असतो. सामान्यज्ञानी असतो. भाषातज्ज्ञ असतो. म्हणजे असायला हवा! आणि हे तज्ज्ञपण रोजच्या व्यवहारात उतरवणं जमायला हवं.

आपण आपल्या जीवनात गोष्टी कशा शिकतो?

पाहून, ऐकून, काही गोष्टी सहजपणे आपल्यात मुरतात, काहींचं शिक्षण आपण घेतो. नवं ज्ञान मिळवणं, विचार करणं हे मोठेपणी चालू राहतं का? आणि मग असे आपण, विद्यार्थीदशा हरवलेले पालक पोरांच्या मागे अभ्यासाचा ससेमिरा लावतो. तीन वर्षाच्या पोरानं ABCD लिहावं असं आपल्याला वाटतं, ह्या शर्यतीत आपलं मूल काय गमावतं आहे, कोणते ताण सोसतं आहे, त्याचं व्यक्तिमत्व कोणता आकार घेत आहे याचं भान आपल्याला राहतं का?



मुलांशी पालकांनी कसं वागावं याचा हा मंत्र! दूध तूप शिरा मासा... म्हणजे काय?

दु - मुलांकडे **दुर्लक्ष** करू नका
ध - त्यांना सतत **धमक्या** देऊ नका
तु - इतरांशी सारखी **तुलना** करू नका
प - त्यांचे निर्णय **परस्पर** घेऊ नका
शि - त्यांच्यावर **शिक्के** मारू नका
रा - **रागावू** नका
मा - मुलांना **मारू** नका
सा - **सारख्या** आज्ञा करू नका

हे पालकांनी प्रामाणिकपणे पाळलं तर मुलं कशाला वाईट मार्गाला जातील?



मुलाची स्वप्रतिमा छान बनवणं पालकांच्या हाती असतं.

मी चांगला माणूस आहे. माझ्यात अनेक क्षमता आहेत. माझ्या भोवतालचं जग छान आहे. मला काहीतरी चांगलं काम करायचं आहे, असं मुलाला वाटलं पाहिजे. याची तयारी आईवडील करू शकतात. याचा पाया घालू शकतात.

एक होती शोभा

गोष्ट - अमृता कावणकर
चित्र - भक्ती दलाल



एका गावात एक मुलगी राहायची. तिचं नाव शोभा. शोभाला दोन गोष्टी खूप आवडायच्या. एक तर फुलं आणि दुसरी छोटी मुलं. मुलांना जमवून ती गोष्टी सांगायची. गाणी म्हणायची, त्यांच्याबरोबर खेळायची, मुलं खुशम–खुश व्हायची.

हळूहळू शोभा मोठी झाली. गावातल्या इमारतीसुद्धा **मोठ्या-मोठ्या** झाल्या. गावभर पसरल्या. मुलांना खेळायला जागाच उरली नाही.



मुलं कंटाळून गेली. रोज शाळा-घर. घर-शाळा. खेळणी भरपूर होती. टीव्हीसुद्धा होता पण मजाच येत नव्हती त्यांना. गावात मधोमध एक मोठं मैदान होतं. मोठी माणसं म्हणाली, ''इथे मोठ्ठी बिल्डिंग उभी करू किंवा ऑफिसेस करू. नाहीतर मोठ्ठा मॉल उभारू किंवा इथून गावातल्या टेकडीवर जाणारा रोप-वे करू!''



पण मग काही मोठ्या माणसांना मुलं आठवली. ती म्हणाली, ''ही जागा छोट्या-छोट्या मुलांना देऊ. त्यांना खेळू दे इथे. पण कोण बरं तयार करेल मुलांसाठी अशी सुंदर जागा?'' मग त्यांना शोभा आठवली. त्यांनी ही जागा शोभाच्या ताब्यात दिली. शोभा अगदी आनंदून गेली.



तिने एक सुंदर स्वप्न बघितलं. ''या जागेत छानसं जग तयार करू या. छोट्या मुलांचं छोटं भवन.

'बालभवन.'

इथे कोणीच त्यांना रागावणार नाही. मारणार नाही. मुलं इथे मस्त खेळतील. धमाल करतील.''

शोभा आणि तिची टीम कामाला लागली.
खेळायला वाळू, भरपूर चित्रं, गोष्टी, गाणी, खेळ, गोष्टींची पुस्तकं, घसरगुंड्या, झोके, आणि भरपूर प्रेम असं सगळं सगळं त्यांनी या बालभवनात जमा केलं. गच्चं भरून ठेवलं.



आणि मग एके दिवशी... संध्याकाळी...मैदानाचं दार उघडलं. मुलं धावत आली. नाचायला लागली, बागडायला लागली, मातीत खेळली, लोळली, त्यांनी गप्पा मारल्या, गोष्टी ऐकल्या, गाणी म्हटली. खडूने फरशीवर चित्रं काढली.

सगळी खुशम–खुश झाली. सगळे गोलात उभे राहिले आणि त्यांनी मिळून एक गाणं म्हटलं.



अक्कड धूम टक्कड धूम,
चुन, चुन, चुन

धो–धो, सो–सो,
चुन, चुन, चुन

नको धावणे रस्त्यातून,
नको खेळणे गर्दीतून

गंमत–जंमत मित्र कुठे?
चला जाऊ या रोज तिथे

इथे मोकळे हे अंगण
''आमच्यासाठी बालभवन!''

- श्यामला वनारसे

फिशिरा®

गोष्ट - जुई चितळे | चित्र - ओंकार महामुनी

एकदा फिशिरा आणि तिच्या मित्र–मैत्रिणींनी ठरवलं की आपण वेगवेगळ्या गोष्टींची रेस लावू या. पोहण्याची शर्यत, लपवलेले मोती शोधण्याची रेस, कमीत कमी वेळात जास्तीतजास्त समुद्री गवत खाण्याची रेस अशा धमाल स्पर्धा ठरल्या. जे जिंकतील त्यांना बक्षीस द्यायला सुंदर माळासुद्धा त्यांनी तयार केल्या.

फिशिरा, ऑक्टी, टम्पू आणि किरो उत्साहाने तयार होऊन आले. फिशिरा म्हणाली, ''बघा मीच जिंकणार आहे स्पर्धेत. मी काल पोहण्याची मस्त प्रॅक्टिस केली आणि बाकीच्या स्पर्धांमध्ये पण मीच पहिली येणार!'' ऑक्टी, टम्पू आणि किरो हसले आणि म्हणाले, ''पण आम्ही जिंकलो तर?''

''नाही, मीच जिंकणार. मी जिंकले नाही तर मग काही मज्जा नाही. मी खेळणारच नाही मग तुमच्याशी कधी.''



फिशिरा एकदम असं का म्हणाली? तिच्या मित्र–मैत्रिणींना फार आश्चर्य वाटलं. स्पर्धा सुरू झाल्या. पहिल्यांदा पोहण्याची शर्यत होती. एक...दोन...साडे...माडे...तीन म्हटल्याबरोबर सगळे पोहायला लागले. फिशिरा एकदम वेगाने पोहत पुढे गेली आणि ठरलेल्या मोठ्या दगडापाशी जाऊन पोचली.



असं म्हणत तिने मागे वळून बघितलं तर तिचे मित्र अगदी हळूहळू पोहत होते. दुसऱ्या स्पर्धेची सुरुवात झाली... रेडी स्टेडी गो म्हटल्यावर फिशिरा वाळूमध्ये लपवलेले मोती शोधायला लागली. तिने भराभर ७–८ मोती शोधून काढले.



मग तिचं इतरांकडे लक्ष गेलं तेव्हा ते तिघे एकमेकांकडे बघत आणि हसत नुसतेच वाळूत खेळत होते. फिशिरा या वेळीसुद्धा ओरडली
''मीच शोधले जास्त मोती... मी जिंकले.''
पण यावेळी ती जास्त खूश होऊन नाही ओरडली.



तिसऱ्या स्पर्धेत ती भराभर समुद्री गवत खायला लागली पण बाकी कोणी काही खात नाहीये बघून मात्र ती चिडली.

''असं का करताय? कुठल्याही रेसमध्ये तुम्ही नीट भाग घेत नाही आहात. मीच जिंकतेय सगळ्यामध्ये.''

सगळे म्हणाले, ''तुला तर जिंकायचं होतंच की! जिंकली नाहीस तर रुसून बसणार होतीस आणि आता जिंकली आहेस तरी चिडून बसली आहेस. नक्की काय हवंय तुला?''

''खेळण्यातली मजा हवीये. तुम्ही मुद्दाम मला जिंकू देताय त्यामुळे जिंकल्याचा आनंद पण होत नाहीये.''

''मग आता काय करायचं?''


''पुन्हा घेऊ या सगळ्या स्पर्धा. या वेळी मी जिंकले, हरले, काहीही झालं तरी चालेल. पण तुम्ही सगळे नीट खेळा.'' हुर्रे म्हणत सगळे पुन्हा शर्यतीसाठी तयार झाले.

Interpersonal Intelligence




- आभा भागवत

तुला आवडेल तसं हे चित्र पूर्ण कर आणि त्याचं प्रतिबिंब काढून संपूर्ण चित्र रंगव.







पालकांसाठी - प्रतिबिंब काढताना छोट्या मुलांना जरुर मदत करा. नव्या कागदावर वेगवेगळ्या चित्रांची प्रतिबिंब काढायला प्रोत्साहन द्या. तुम्हीही मुलांबरोबर चित्रं काढा.



Visual Spacial Intelligence



Katti Batti

Poem - Nivedita Neelam
Illustration - Omkar Bagwe

Katti was feeling grumpy.
Noone was following her rules.
Playing pretend Princess was the best game ever!
But her friends agreed with her never!

Katti decided, she didn't need anyone.
And started playing on her own!
How hard could a puzzle be? she thought.
Well, for one person it was a lot!

Katti went on a solo treasure hunt next.
She sifted the garden soil and lo and behold
A sparkling, blue pebble, she had found.
Look! She shouted, but there was no one around.

Katti was feeling hungry now.
Sigh! No dabba party with friends today.
Just one dabba and the same old poli roll.
Hmph! It felt so dull being a lonely soul.

I am BORRREEEDDDDDDDDDDDD!
Katti let out a wail and started crying.

“Kaaattiiiiiiiiiiiii”, Batti ran towards her.
Will you help us build a fort?
Happy little Batti never left anyone behind!
Katti finally smiled and joined her friends.


That day Katti and Batti together
came up with a Brilliant Idea.
Every time the friends fought
they would sort it out with a Special Idea Song!



Your idea! My idea!...
Mix Mix Mix
New idea! Better idea!...
Stir Stir Stir
More Friends! More smiles!...
Yay Yay Yay

मज्जा बिज्जा

- तनया देसाई




चित्र डोकू



ही चार चित्रं नीट बघ. प्रत्येक गडद चौकोनातून कुठलं तरी एक चित्र गायब झालंय. ती चित्रं शोधून तू काढ.

शोध आणि चिकटव

या तीन गोलांमध्ये सांगितलेल्या गोष्टी चिकटव





लपलेलं चित्र

आऊटलाईनमध्ये रंग भरून तू चित्र रंगवतोस ना? आता उलट करू या. स्केचपेन घेऊन या चित्रात आऊटलाईन काढून लपलेलं चित्र पूर्ण कर. त्यात नक्षीसुद्धा काढता येईल.



चिकूPiku®

गोष्ट - अमृता कावणकर
चित्र - भक्ती दलाल




*अविनाश कुलकर्णी या आपल्या छोट्या मित्राने सगुणेच्या वासरासाठी सुंदर नाव सुचवलंय - **'टिकू'**. टिकू आता थोडा मोठा झालाय. चिकूपिकूचा तर तो घट्ट मित्र झालाय. चिकूपिकू जिथे जातील तिथे तो त्यांच्या मागे-मागे भटकत असतो.*

''**टिकू**, तुला कितीदा सांगितलं, चिकू–पिकूच्या मागे फिरण्यापेक्षा जरा गाई–म्हशींबरोबर राहत जा. कसं बसायचं, कसं उठायचं, गवत कसं खायचं हे त्याच शिकवतील तुला.'' सगुणा गाय टिकूला समजावत होती.

टिकू म्हणाला, ''अगं पण चिकू आणि पिकूसुद्धा मला खूप काही शिकवत असतात. चिकूने मला वास कसा ओळखायचा शिकवलंय, शेपूट कशी वर करायची आणि गुरगुर कसं करायचं ते पण शिकवलंय आणि पिकूकडून तर मी आता पक्ष्यांची भाषा शिकतोय.''


''पण त्याचा तुला काय उपयोग होणारे? गुरांच्या गोष्टी शिकून घे.'' सगुणा जरा रागातच टिकूला म्हणाली. ''बरं ठीके'' म्हणत टिकू गोठ्यात जाऊन बसला.



दुसऱ्या दिवशी टिकू, सगुणा आणि सगळ्या गुरांबरोबर टेकडीवर चरायला गेला. टेकडीवर भटकायला, उड्या मारायला टिकूला मजा येत होती. सगुणा तिच्या मैत्रिणींबरोबर गप्पा मारत चरत होती. फिरत फिरत टिकू टेकडीच्या दुसऱ्या बाजूला आला आणि वाट चुकला. ''अरे कुठे गेले सगळे?'' टिकू जरासा घाबरला. त्याने थोडा विचार केला. ''आयडिया!'' टिकू ओरडला. तो जमिनीला नाक लावून गुरांचा वास हुंगत हुंगत वाट शोधायला लागला.

तितक्यात कुठूनतरी दोन रानटी कुत्री आली. टिकुवर भू भू भुंकायला लागली. टिकू बिचकला. पण त्याला चिकूची युक्ती आठवली. त्याने शेपूट वर घेतली आणि तो गुरगुरायला लागला. ''अरे हा नक्की कोण आहे? आपल्यासारखा कसा काय गुरगुरतोय?'' दोन्ही कुत्री गोंधळली आणि पळून गेली.

''कसं शोधू मी आईला आता?'' तितक्यात त्याला झाडावर एक पक्षी दिसला. कू कू कू करत तो पक्ष्यांच्या तोडक्या मोडक्या भाषेत बोलायला लागला. ''कू कू कू...मला मदत करशील? मी वाट चुकलोय. तुला झाडावरून गुरांचा कळप कुठे दिसतोय का बघशील का?'' ''हो बघतो की.'' पक्षी म्हणाला आणि मान वाकडी तिकडी करत इकडे तिकडे बघायला लागला. त्या तिकडे दूर त्याला गुरं दिसली. ''चल माझ्या मागं.'' पक्षी म्हणाला. पक्षी उडाला, टिकू त्याच्या मागे पळायला लागला. पाचच मिनिटात टिकूला त्याचा कळप दिसला. पळत जाऊन तो आईला बिलगला. सगुणेनं त्याला लपलप चाटलं.



''कुठे गेला होतास तू?

किती शोधलं तुला! तुझे लाडके चिकूपिकू पण मदत करत होते शोधायला.''

''चिकूपिकू तुम्ही पण आलात? आई, तुला माहितीये चिकूपिकूने शिकवलेल्या युक्त्या वापरूनच मी शोधलं तुम्हाला.'' टिकूने सगळा किस्सा सांगितला.

''अरे वा! मला वाटलं नव्हतं या युक्त्या उपयोगाला येतील. सॉरी हं! मी जास्तच ओरडले तुला काल. तू खेळत जा चिकूपिकूबरोबर, पण कळपासोबतसुद्धा राहायचं हं.''

''हो. पण आत्ता जाऊ खेळायला? जाऊ दे ना गं!''


''जा'' सगुणेनं लाडाने टिकूला गोंजारलं. ''चला पकडापकडी खेळू या, टिकू तुझ्यावर राज्य!'' चिकू म्हणाला. पकडापकडीचा खेळ सुरू झाला.

linguistic Intelligence

चिमणी चित्रं


- आभा भागवत

असे षट्कोन काढायचा प्रयत्न कर. एकसारखे षट्कोन नाही आले तरी चालेल.



मी दोन दोन षटकोनांच्या जोड्या करून त्यांत सारखी नक्षी काढली आहे. तुही तुझ्या आवडीची नक्षी काढून चित्र पूर्ण कर. असं चित्र दुसऱ्या कागदावरसुद्धा काढून बघ.

पालकांसाठी -
षट्कोन समजून घ्यायला आणि चित्रात काढायला मुलांना हवी असेल तर मदत करा. आकार नाही जमला तरी कौतुक करा. एखादा आकार आत्ता नाही जमला तरी नंतर नक्की जमेल, त्याची घाई न करता वाट बघू या.



Visual Spacial Intelligence

तुझ्या चित्राचा फोटो आम्हाला नक्की पाठव
9172136478

Science सैर

गोष्ट - शिवानी पेठे | चित्र - ओंकार बागवे



छोट्या संजीतचे भरपूर मित्र होते. हे मित्र त्याला कित्तीतरी गमती जमती सांगायचे. कधी त्याला सातासमुद्रापलीकडच्या गोष्टी सांगायचे तर कधी प्राण्यांच्या गोष्टी सांगायचे. पण या मित्रांचे आवाज फक्त संजीतलाच ऐकू यायचे. हे मित्र म्हणजे पुस्तकं. संजीतच्या घरात भरपूर पुस्तकं होती. जेव्हा पाहावं तेव्हा संजीत पुस्तकांसोबतच असायचा.



एके दिवशी संजीत त्याच्या बाबांना म्हणाला, ''घरातली सगळी पुस्तकं वाचून झाली! आता मी काय करू?'' बाबांनी त्याच्या हातावर एक रुपया ठेवला आणि म्हणाले, ''चौकातलं ग्रंथालय माहितीये ना तुला? तिथे जा.'' संजीत पायी पायी निघाला. एका इमारतीपाशी येऊन थांबला. यापूर्वी तो कधीच ग्रंथालयात गेला नव्हता. दार उघडून तो आत गेला आणि बघतो तर काय! तिथे पुस्तकांच्या ओळीच ओळी होत्या.

''बापरे, इतऽऽऽकी पुस्तकं!'' संजीत म्हणाला. पुस्तकं संजीतकडे बघून हसत होती. ''इथे तर हवी ती पुस्तकं मिळतील. तीन पुस्तकं घरी न्यायची आणि वाचून झाली की परत आणून द्यायची आणि दुसरी तीन पुस्तकं घेऊन जायची. कसलं भारी!'' संजीत म्हणाला. त्याने तीन पुस्तकं निवडली.



दोनच दिवसात त्याची तीन पुस्तकं वाचून संपलीसुद्धा. ती परत करून दुसरी तीन पुस्तकं तो घेऊन आला. त्याला अंतराळ म्हणजे स्पेसची पुस्तकं वाचायला आवडायला लागलं. लठ्ठ-लठ्ठ पुस्तकं तो झट-झट वाचून काढायचा.

ग्रंथालयात एक काकू होत्या. त्या पुस्तकं द्यायचं आणि घ्यायचं काम करायच्या. एकदा ग्रंथपालकाकूंनी संजीतला विचारलं, ''तू खरंच पुस्तकं वाचतोस का नुसती पानं उलटतोस रे? चल, मी तुला या पुस्तकातले प्रश्न विचारते, बघू या तू किती वाचतोस''
''हो...विचारा'' संजीत म्हणाला.
''मग सांग, सगळ्यात मोठा ग्रह कुठला?''
''सोप्पय! गुरू'' संजीत म्हणाला. काकूंनी दुसरा प्रश्न विचारला, ''उंट पाणी कुठे साठवतो?''
''उंटांच्या पाठीत''
काकूंनी भरपूर प्रश्न विचारले. संजीत पटापट उत्तरं देत होता. काकू खूश झाल्या, म्हणाल्या, ''आजपासून तुला हवी तितकी पुस्तकं नेत जा.''

पुस्तकं वाचून संजीतला आता प्रश्न पडायला लागले. ''हे अंतराळ कसं तयार झालं असेल बरं? ग्रह, तारे एकमेकांशी बोलत असतील का? तिकडचे आवाज आपल्याला ऐकू का येत नाहीत?'' संजीतने प्रश्न कोणाला विचारले माहितीये? त्याच्या मित्राला. पुस्तकाला. पुस्तक म्हणालं, ''आवाज म्हणजे लहरी. तुझे बाबा तुझ्याशी बोलतात तेव्हा आवाजाच्या लहरी तुझ्या कानात पोहचतात आणि तुला ऐकू येतं. या लहरी दिसत नाहीत. अंतराळातसुद्धा अशा लहरी तयार होतात. पण आपल्यापर्यंत पोहचायला त्यांना कितीतरी वर्षे लागतात. शिवाय अशा लहरी आपल्या कानांना ऐकूच येत नाहीत.''


''अंतराळातल्या गप्पा आपल्याला ऐकता आल्या तर! दोन तारे फुगडी खेळत काय गप्पा मारतात? नवीन तारे जन्माला येताना काय होत असेल? भलीमोठ्ठी ब्लॅकहोल्स एकमेकांवर आदळतात तेव्हा किती मोठा आवाज होत असेल ना? या ताऱ्यांकडून, ग्रहांकडून येणारे संदेश आपल्याला कळले तर किती मजा येईल!'' संजीत कल्पना करत होता.

पुस्तकं वाचत, स्वप्न बघत संजीत मोठा झाला. तो संशोधक झाला. संशोधक म्हणजे अभ्यास करून, विचार करून काहीतरी शोधणारा. तुला माहितीये संजीत सध्या काय शोधतोय?

संजीत त्याच्या टीमसोबत एका भन्नाट प्रोजेक्टवर काम करतो. त्याची टीम मोठ्ठाले कान तयार करणार आहे. हे साधेसुधे कान नाहीयेत हं. या कानातून आपल्याला काय ऐकू येणारे माहितीये?

अंतराळातले म्हणजे स्पेसमधले संदेश. संजीतचं स्वप्न आता खरं होणार आहे. या कानाला म्हणतात लायगो/ LIGO (Laser Interferometer Gravitational wave Observatory) LIGO INDIA प्रोजेक्टवर संजीत त्याच्या टीमबरोबर काम करत आहे. हिंगोली गावात हे मोठ्ठाले कान उभारणार आहेत. आपणही अंतराळातले हे संदेश आता ऐकू शकू. आहे की नाही मोठ्या कानांची मोठी गंमत?





पुस्तकांचा घट्ट मित्र असलेला हा संजीत म्हणजे सध्या आयुकामध्ये काम करणारे संशोधक

संजीत मित्रा


पालकांसाठी : संजीत म्हणाले, "मी माझ्या बाबांना आणि आजीला कायम पुस्तकं वाचताना बघत मोठा झालो. त्यातूनच मला वाचायला आवडायला लागलं. ज्ञान मिळवणें, वेगवेगळ्या गोष्टी समजून घेणे यात विलक्षण आनंद आहे. मुलांना नवीन पुस्तकं वाचू द्या, कोडी सोडवू द्या, अडचणींना सामोरं जाऊ द्या. उत्तरं, युक्त्या स्वतः शोधू द्या. मुलांना नवीन काही करायला मिळत नाही तेव्हाच त्यांना कंटाळा येतो. नवीन ज्ञान आपसूक मिळत गेलं तर त्यांना कधीच कंटाळा येणार नाही."

Intra-Personal Intelligence

पहिल्या सुरीची गोष्ट

गोष्ट - अनघा कुसुम | चित्र - भक्ती दलाल


ही गोष्ट आहे कबीरच्या आजोबांच्या आजाच्या ढोपरआजीच्या बाबाच्या खापरपणजीच्या निपणजीच्या ढोपरआजीच्या खापरआजाची– **सुकरूआजाची.** सुकरूआजा तामिळनाडूमधल्या अकीरापटम नावाच्या गावात एका सुंदर नदीकाठी एका टोळीत राहायचा. टोळीमध्ये लहान, तरुण आणि म्हातारे असे मिळून ५० जण होते.



ही टोळी दिवसभर जंगलात फिरून लहान लहान शिकारी करायची. कंदमुळं आणि फळं गोळा करायची. ते सगळे रात्री झाडांच्या ढोल्या किंवा झाडांची मुळं एकमेकात गुंतून तयार झालेल्या कमानीमध्ये राहायचे. तरुण मंडळी आणि लहान मुलं आठवड्यातून दोन–तीनदा शिकार करायला आणि फळं कंदमुळं गोळा करायला जायचे. सुकरूआजा, झोलीआजी, रंपूआजा, ढप्पूआजा आणि ठंजीआजी मागे राहायचे. ते शिकारीहून आणलेले मांस खरवडून ठेवायचे. फळामधला गर काढून ठेवायचे. हे सगळं करायला त्यांच्याकडे सुरी नव्हती काही. ते वापरायचे नखं आणि दात. त्यांच्या तोंडातले नाहीत हं.

टोळीमधल्या कुणाचेही दात पडले की ते आपले दात झोलीआजीला आणून द्यायचे. ती ते सगळे दात एका करवंटीमध्ये जमवायची. शिकार करून आणलेल्या प्राण्याचे दात आणि नखंदेखील ती एका वेगळ्या करवंटीमध्ये गोळा करायची. झोलीआजी करवंटीमध्ये जमवलेले दात आणि नखं रोज नदीवर जाऊन स्वच्छ घासायची. मग सुकरूआजा आणि बाकी सगळे त्याने मांस साफ करायचे.

एक दिवस मात्र गंमतच झाली. झोलीआजी नदीत करवंटीमधले दात घासत असताना करवंटी गेली पाण्यात वाहून. दातांसकट! आता दात उरले ते फक्त त्यांच्या तोंडात. त्यादिवशी मग मांस खरवडणार कसं? असा मोठा प्रश्न तयार झाला. अचानक सुकरूआजाला सुचली एक कल्पना. त्याने फळं चेचण्यासाठी वापरायचा गोलाकार दगड उचलला आणि त्या दगडाने तो मांस साफ करू लागला. पण तो दगड काही दाताइतका अणकुचीदार नव्हता त्यामुळे त्या दिवशी मांस सोलायला खूप म्हणजे खूपच वेळ लागला.



एव्हाना सकाळी शिकारीला गेलेली टोळी परत आली. तरी सुकरूआजा कामच करत होता. रात्री जेवताना सुकरूआजाने झालेली गंमत सगळ्यांना सांगितली. टोळीतली एक मुलगी झिनी ते लक्ष देऊन ऐकत होती. तिला एक आयडिया सुचली. तिने पुढच्या वीसवेळा शिकारीला बुट्टी मारली. ती मग रोज लपतछपत टोळीपासून लांब जाऊन एका झाडामागे एक प्रयोग करायला लागली. तिने दोन दगड घेतले. त्यातला एका दगड ती दुसऱ्या दगडावर नीट जोर लावून आपटत होती. २० सूर्योदय आणि २० सूर्यास्त होईपर्यंत तिची ही दगडांची आपटाआपटी चालू होती. मारून मारून तिने त्या दगडाला एका बाजूला थोडीशी धार तयार केली. आणि एकविसाव्या सूर्योदयानंतर... सूर्य डोक्यावर तळपत असतानाच तयार झाली भारतातली **पहिली सुरी!**



खूश होऊन तिने आजूबाजूला पडलेली आठ दहा हिरवीगार पानं गोळा केली. त्यात ती सुरी नीट गुंडाळली. एका वेलीने ती पुरचुंडी नीट बांधली आणि त्यावर एक छानसं पिवळधम्मक फूल खोचलं.



संध्याकाळी सगळ्यांचं जेवण झाल्यावर तिने ते गिफ्ट सुकरूआजोबांना दिलं. ते गिफ्ट बघून सुकरूआजा एवढा खूश झाला की झिनीला खांद्यावर घेऊन गोल– गोल नाचायला लागला. आणि हा होता भारतातला पहिला विक्टरी डान्स!!

ही बघ, अशी होती ती पहिली सुरी!





तुला जर तुझी स्वतःची सुरी तयार करायला सांगितली तर तू ती कशापासून बनवशील? चित्र काढून किंवा लिहून आम्हाला पाठवशील?

पालकांसाठी - मुलांशी याविषयी जरूर बोला. ते काय म्हणताहेत ते चित्र, व्हिडिओ किंवा व्हॉइस नोटच्या स्वरूपात आम्हाला नक्की पाठवा.

9172136478

चित्र गप्पा

पुढच्या पानांवर एक मस्त चित्र दिलंय ते बघून आई-बाबांशी, आजी-आजोबांशी, मित्र-मैत्रिणींशी गप्पा मार.

चित्रात कुत्रा दिसतोय का? त्याचं नाव काय असेल? कुत्र्याच्या पोटावर झोपलेला मुलगा काय विचार करत असेल? ताईंच्या मागे पळत मुलं काय खेळ खेळतायत? सूर्यनमस्कार घालणारी मुलं दिसली का? एक आजी छोट्या मुलाला गोळी देतायत त्या शोध बरं. अजून कोण काय काय करतंय ते तूच सांग.

चित्रातल्या या वस्तू शोधून काढ.

(1) लेझीम, (2) निळी गाडी, (3) मांजर, (4) खारुताई, (5) निळा बूट, (6) चेंडू, (7) बुलबुल पक्षी, (8) पिवळी बादली, (9) पेन्सिल, (10) फुलं

पुढच्या चित्रात मुली किती आणि मुलगे किती आहेत?

मुली ____ मुलगे ____





चित्र - भक्ती दलाल

चित्र गप्पा

ऊमावशीची गोष्ट

चित्र- हबीब अली

ऊ माहितीये का तुला? केस स्वच्छ ठेवले नाहीत की ही ऊ आपल्या केसात घर करते. इकडून–तिकडे हिंडते आणि मग डोकं खाजायला लागतं. पण आपल्या या गोष्टीतली ऊमावशी जरा वेगळीच आहे हं. ती राहते गंमत गावात. गंमत गावात छोटे–छोटे गमतीशीर लोक राहतात. सगळे शेती करतात. ऊमावशीसुद्धा या गावात राहते. तिचं एक छोटंसं मक्याचं शेत आहे. गावाच्या शेजारी छोट्या प्राण्यांचं छोटंसं जंगल आहे. जंगल पार केलं की छोट्या राजाचा मोठ्ठा महाल आहे.

एके दिवशी राजाने दवंडी पिटवली. **''ऐका हो ऐका... टिंगू महाराजांच्या हुकुमावरून गावकऱ्यांनी शेतात पिकवलेली अर्धी कणसं राजदरबारात द्यायची आहेत होऽऽऽ...''** सगळे गावकरी काळजीत पडले. ''आपण कष्ट करायचे आणि कणसं राजाला देऊन टाकायची?'' पण राजाला कोण काय बोलणार! शेतातली कणसं पिकली की सैनिक कणसं कापून घेऊन जायचे.






ऊमावशीची मक्याची कणसंसुद्धा आता पिकली होती. ऊमावशी गावकऱ्यांना म्हणाली, ''मी माझा एकही मका राजाला देणार नाही. मी जाणार आहे राजाला धडा शिकवायला. तुम्ही फक्त माझी वाट बघा.'' ऊमावशीने तिच्या शेतातली सगळी कणसं तोडली. घरात लपवून ठेवली. आणि जंगलाच्या वाटेने ती तुरूतुरू निघाली. वाटेत तिला भेटला एक दगड. दगड म्हणाला, ''ऊमावशी, कुठं निघालीस संध्याकाळची?'' ''राजाला धडा शिकवायला.'' ऊमावशी म्हणाली. ''मीपण येऊ?' दगडाने विचारलं. ''हो ये की!'' ऊमावशी म्हणाली.

पुढे ऊमावशी आणि तिच्या मागे दगड. दोघे निघाले. ऊमावशीने जोरात आरोळी ठोकली, **''मांग करो, मांग करो. हम सब एक है!''** दगडसुद्धा मागून ओरडला, ''मांग करो, मांग करो. हम सब एक है!'' थोडं पुढे गेल्यावर त्यांना भेटला एक विंचू. त्याने विचारलं, ''कुठे निघालात दोघे?'' ''राजाला धडा शिकवायला.'' विंचू म्हणाला, ''राजाला धडा शिकवायला? मीपण येऊ का?'' ''हो चल की.'' ऊमावशी म्हणाली. ऊमावशी, तिच्यामागे दगड आणि दगडामागे विंचू असे निघाले ओरडत. ''मांग करो, मांग करो. हम सब एक है!'' तितक्यात पाल्यापाचोळ्यातून सळसळ आवाज आला. एक काळा–पिवळा साप बाहेर आला. साप म्हणाला, ''कुठं निघालात असे ओरडत?'' ''राजाला धडा शिकवायला.'' ऊ मावशी म्हणाली. ''चला मीपण येतो.'' सापसुद्धा निघाला. पुढे ऊमावशी, तिच्यामागे दगड, त्याच्यामागे विंचू आणि त्याच्यामागे साप असे निघाले ओरडत. ''मांग करो, मांग करो. हम सब एक है!'' थोडं पुढे गेल्यावर झाडीतून उडी मारून वाघोबा आला. त्याने विचारलं, ''कुठं निघालात इतक्या रात्रीचे?''

''राजाला धडा शिकवायला.''

''मग मीपण येतो. येऊ का?''

''हो ये की.''



मग काय! ऊमावशी, तिच्यामागे दगड, त्याच्यामागे विंचू, त्याच्यामागे साप आणि त्याच्यामागे वाघोबा चालत निघाले.



''मांग करो, मांग करो. हम सब एक है! मांग करो, मांग करो. हम सब एक है!'' आरोळी द्यायला लागले. जंगल पार करून ते महालापाशी पोहोचले. सगळीकडे सामसूम होती. ऊमावशीने सगळ्यांच्या कानात एक जबरदस्त प्लॅन सांगितला. ''किचपीच... किचपीच... ऊ ऊ ऊ.''

''चालेल!'' सगळे म्हणाले. आणि कामाला लागले. ऊमावशी आणि विंचू महालाच्या फटीतून राजाच्या खोलीत शिरले. सरसर सरपटत साप खिडकीतून खोलीत शिरला. दगड आणि वाघोबासुद्धा ठरलेल्या जागी लपले.

खोलीत राजाचा पलंग होता आणि त्यावर होती त्याची उशी. ऊमावशी उशीखाली लपून बसली. थोड्याच वेळात राजा खोलीत आला. आणि उशीवर डोकं ठेवून झोपला. ऊमावशी हळूच बाहेर आली आणि राजाच्या केसात शिरली. इकडे तिकडे फिरायला लागली. राजाच्या डोक्याला खाज सुटली. खसखसखसखस... खसखसखस... तो डोकं खाजवायला लागला. खाज अजून वाढली. राजा वैतागला. तो उठला. पलंगाशेजारचा दिवा लावायला त्याने हात लांब केला. तसा तिथे लपलेल्या विंचवाने त्याच्या हाताला डंख मारला. 'ओय ओय ओय' करत राजाने हात झटकला आणि पटकन दिवा लावला. पण आजूबाजूला कोणीच दिसत नव्हतं.



पलंगावरून उतरण्यासाठी राजाने पाय जमिनीवर टेकवले, तितक्यात पलंगाखाली लपलेला साप राजाच्या पायाला चावला. साप विषारी नव्हता त्यामुळे राजाला पायाला फक्त चुरचुरलं, झोंबायला लागलं. 'ओय ओय ओय, कोणीतरी या. मदत करा.' सैनिकांना बोलावायला राजा लंगडत खिडकीपाशी गेला. तितक्यात खिडकीवर लपलेला दगड त्याच्या डोक्यात पडला. ''आई... आई.. गं. हे काय होतंय!''



राजा सैनिकांना हाक मारणार तितक्यात बाहेर लपलेला वाघोबा झेप घेऊन त्याच्या समोर उभा राहिला. राजाची घाबरगुंडी उडाली. ऊमावशी, विंचू, आणि साप बाहेर आले. एका ओळीत उभे राहिले आणि त्यांनी आरोळी ठोकली, ''मांग करो, मांग करो. हम सब एक है! मांग करो, मांग करो. हम सब एक है!'' खिडकीतून उडी मारून सगळे गावाच्या दिशेने पळाले. गावकरी वाट बघत होते. ऊमावशीला पाहून सगळे आनंदी झाले. सगळे ओरडू लागले, ''मांग करो, मांग करो. हम सब एक है! मांग करो, मांग करो. हम सब एक है!''

तितक्यात लंगडत लंगडत राजा तिथे आला. सगळे घाबरले. ''आता ऊमावशीला नक्कीच शिक्षा होणार.'' सगळे शांत उभे राहिले. पण झालं भलतंच. राजा म्हणाला ''ऊमावशीने आणि तिच्या मित्रांनी मला चांगलाच धडा शिकवलाय. माझी चूक झाली. सॉरी! यापुढे तुमची कणसं मी घेणार नाही.'' आणि मग राजा जोरात ओरडला, **''बोलो रे बोलो, जोर से बोलो, हम सब एक है!''** सगळे गावकरी आनंदाने ओरडले, **''हम सब एक है!''**

ऊमावशीने दुसऱ्या दिवशी काय केलं माहितीये? तिच्या शेतात पिकलेल्या मक्याच्या कणसांचं तिने जात्यावर पीठ दळलं. ते भिजवलं. आणि त्याचे छान गोल गरगरीत डोसे केले. सगळ्यांना खाऊ घातले. राजाने तर नऊ–दहा डोसे फस्त केले. आहे की नाही, ऊमावशी हुशार आणि साहसी!



ही गोष्ट कोणी लिहिली ते माहित नाही पण बालभवनात जेव्हा शोभाताई ही गोष्ट सांगायच्या तेव्हा मुलं आ वासून ऐकत राहायची. पुन्हा-पुन्हा सांगायला लावायची.

गंमतजत्रा खेळ

- शोभा भागवत
चित्र - ओंकार मरकळे

मुलांना जे खेळ खेळताना मजा वाटेल, हसू येईल, कधी स्मरणशक्ती अजमावून पाहता येईल, कधी ती विचारात पडतील असे हे खेळ आहेत. खरं तर अशा खेळांना काही अंतच नाही, पण घरच्या घरी खेळता येतील असे काही सोपे खेळ देत आहोत. तुम्ही असे आणखी खेळ शोधून खेळत राहा.

भाग १: मुलांच्या ओळखीच्या १०-१५ वस्तू मांडून ठेवा. पेन्सिल, बाटली, बांगडी, पुस्तक, कात्री, नाणं अशा प्रकारच्या वस्तू ठेवता येतील. दोन मिनिटे मुलांना त्या वस्तू नीट बघून लक्षात ठेवायला वेळ द्या. त्यानंतर त्यावर कापड टाकून वस्तू झाका. आता मुलांनी आठवून वस्तूंची नावं सांगायची किंवा लिहिता येत असेल तर लिहायची. घरातल्या सगळ्यांना हा खेळ खेळून किती नावं सांगता येतात ते बघा.

भाग २: कपड्याखाली झाकलेल्या वस्तूंपैकी एक किंवा दोन काढून लपवून ठेवा आणि आता पुन्हा कापड काढून वस्तू मुलांना दाखवा. आधीच्यापैकी कोणत्या वस्तू गायब झाल्या ते मुलांनी ओळखून सांगायचं.





स्पर्शाने वस्तू ओळखा

डोळे बंद करून केवळ स्पर्शाने वस्तू ओळखण्याचा हा खेळ आहे. खेळणी, स्वयंपाकघरातील वस्तू, फळं, भाज्या केवळ स्पर्शातून ओळखू येतात का बघा.

अंदाज सांगा

३० काडेपेटीतल्या काड्या, १० पेन्सिली, २५ दाणे, २० नाणी अशा वस्तू घ्या आणि त्याचे ढीग मांडून ठेवा. ढिगाच्या आकारावरून अंदाजे किती वस्तू असतील हे मुलांनी सांगायचं. अंदाजाच्या किती जवळचं उत्तर आहे हे वस्तू मोजून बघायचं.





गाढवाला शेपूट लावा

फळ्यावर शेपूट नसलेल्या गाढवाचं चित्र काढा. डोळ्यावर पट्टी बांधून अंदाजाने गाढवायला शेपटी काढायची. गाढवाऐवजी बाईचा चेहरा काढून तिला टिकली लावा असाही खेळ घेता येईल.



ओता ओती

एका बाटलीत पाणी भरा. खाली न सांडवता मुलांनी एका बाटलीतून दुसऱ्या बाटलीत पाणी ओतायचं. अगदी लहान मुलांना बाटलीत नरसाळे म्हणजेच फनेल ठेवून हा खेळ खेळायला द्या. एकाग्रता आणि हातावरचा ताबा या खेळात महत्त्वाचा ठरतो.




बटण शोधा

गहू किंवा तांदूळ एका पातेल्यात घ्या. त्यात एक बटण लपवून ठेवा. मुलांनी डोळे बंद करून स्पर्शाने धान्यात लपलेलं बटण शोधून काढायचं. दोन मिनिटं वेळ लावून खेळातली चुरस वाढवता येईल.



डोक्यावर पुस्तक ठेवून चाला

एक जाडसर पुस्तक घेऊन ते डोक्यावर ठेवा. हात सोडून डोक्यावर पुस्तकाचा तोल सांभाळत चालता येतंय का? घरातल्या सगळ्यांनी जास्तीत जास्त किती पावलं जाता येतं हे करून बघा



Bodily Kinesthetic Intelligence

मनू आणि तीन अस्वलं

चित्र - गिरीश मालप

('गोल्डीलॉक अँड थ्री बेअर्स' गोष्टीचा शोभाताईंनी केलेला भावानुवाद)

एक गोड मुलगी होती. तिचं नाव मनू. मनू रोज आजीबरोबर रानात जाऊन फुलं गोळा करायची. एक दिवस आजीला घरी काम होतं म्हणून मनू एकटीच रानात गेली. रानात रंगीबेरंगी फुलं फुललेली होती. लाल, पिवळी, निळी, जांभळी, गुलाबी. मनू एक–एक फूल परडीत टाकत होती.

फुलं गोळा करत करत ती रानात अगदी आत आत गेली. संध्याकाळ कधी झाली मनूला कळलंच नाही. थोड्या वेळाने तिने आजूबाजूला पाहिलं तेव्हा अंधार पडायला सुरुवात झालेली होती. ''आता काय करायचं? भूकपण खूप लागलीये!'' तितक्यात तिला थोडंसं पुढे एक टुमदार घर दिसलं. ती चालत चालत घरापाशी आली. घराचं दार उघडंच होतं. ''कोणी आहे का घरात?'' मनूने विचारलं. पण कोणीच काही बोलेना. ती हळूच घरात आली.

तिथे एक मोठं टेबल होतं. बाजूला एक मोठ्ठाली खुर्ची होती, एक मध्यमसर खुर्ची होती आणि एक चिंगुली खुर्ची होती. मनू आधी मोठाल्या खुर्चीवर बसली. ''आं... ही काहीतरीच खुर्ची आहे.'' मग ती मध्यमसर खुर्चीवर बसली. ''ही पण नीट नाहीये. ''मग ती चिंगुल्या खुर्चीवर बसली. ''हं... ही कशी अगदी माझ्या खुर्चीसारखीच आहे!''





टेबलावर तीन वाट्यांमध्ये खीर वाढून ठेवलेली होती. एक मोठ्ठाली वाटी, एक मध्यमसर वाटी, एक चिंगुली वाटी. मनूला इतकी भूक लागली होती की पोटातून गुडगुड आवाज येत होता. मनूने आधी मोठाल्या वाटीतली खीर चाखून पहिली ''छी.. छी..ही काहीतरीच लागतीये.'' मग तिने मध्यमसर वाटीतली खीर खाऊन बघितली. ''छी..छी..छी.. ही पण खीर कशीतरीच लागतीये.'' मग तिने चिंगुल्या वाटीतल्या चिंगुल्या चमच्यामध्ये खीर घेतली आणि चमचा तोंडात घातला. ''यमऽऽऽ... ही अगदी मला आवडते तश्शीच खीर आहे.'' तिने पटापट खीर खाऊन टाकली. मोठी ढेकर दिली.

मनूला आता झोप आली होती. तिने आळस दिला. बाजूला तिला एक जिना दिसला. जिन्याने ती वर गेली. तिथे एक मोठ्ठाला पलंग होता. एक मध्यमसर पलंग होता. आणि एक चिंगूला पलंग होता. मनू आधी मोठ्ठाल्या पलंगावर झोपली. ''ईऽऽऽ...हा तर अगदी कडक आहे.'' मग ती मध्यमसर पलंगावर झोपली. ''ऊइ.. हा तर अगदी खरखरीत आहे.'' मग ती चिंगुल्या पलंगावर झोपली. ''अहाहा... हा अगदी माझ्या पलंगासारखाच आहे.'' तिने पलंगावरचं मऊ मऊ पांघरूण अंगावर घेतलं आणि ढाराढूर झोपून गेली.



हे घर कोणाचं होतं माहितीये? तीन अस्वलांचं. मोठ्ठालं बाबा अस्वल. मध्यमसर आई अस्वल आणि चिंगूलं पिल्लू अस्वल. खीर वाटीत गार करायला ठेवून आई, बाबा आणि पिल्लू अस्वल बाहेर चक्कर मारायला गेले होते. थोड्याच वेळात ते तिघे परत आले. ''चला खीर खाऊ या.'' बाबा अस्वल म्हणाला. तो टेबलापाशी आला आणि म्हणाला, ''कोणीतरी माझ्या वाटीतली खीर चाखून पाहिलीये.'' आई अस्वल म्हणालं, ''कोणीतरी माझ्या वाटीतलीसुद्धा खीर चाखून पाहिलीये.''

पिल्लू अस्वल म्हणालं, ''माझी खीर तर कोणीतरी सगळीच फस्त केलीये.'' आई आणि बाबा अस्वलाने मग पिल्लू अस्वलाच्या वाटीत थोडी थोडी खीर ओतली. त्यात थोडी साखर घातली आणि काजू बदामाची पावडर घातली. पिल्लाला खायला दिली. तिघेही खीर खाऊन झोपायला जिना चढून वर आले.






बाबा अस्वल म्हणालं, ''कोणीतरी माझ्या पलंगावर झोपलं होतं.'' आई अस्वल म्हणालं, ''कोणीतरी माझ्यासुद्धा पलंगावर झोपलं होतं.'' पिल्लू अस्वल टकामका त्याच्या पलंगाकडे बघत उभं होतं. ते म्हणालं, ''कोणीतरी माझ्या पलंगावर झोपलंय!''

अस्वलांच्या आवाजाने मनूला जाग आली. तिने डोळे उघडून बघितलं तर काय? तीन अस्वलं तिच्याकडे बघत होती.


पण मनू मुळीच घाबरली नाही. तिने इकडे तिकडे पाहिलं. शेजारीच तिला एक खिडकी दिसली. ती पटकन उठली आणि टुणकन उडी मारून खिडकीतून बाहेर पडली. आणि पळत पळत घरी जाऊन, आईच्या कुशीत शिरून झोपी गेली.


मुलांची जोडसाखळी

एकमेकांचे हात धरलेल्या मुलांची किंवा मुलींची जोडसाखळी तयार करू या. त्यासाठी लागेल कागद, पेन्सिल, कात्री आणि रंगवण्यासाठी खडू



1. एक जरा लांबुळका आयताकृती कागद घे. कागदाची उंची ही आपल्या साखळीतल्या मुलांची आणि मुलींची उंची असणार आहे. जेवढा लांब कागद असेल तेवढी जास्त मुलं-मुली साखळीत येतील.
2. कागदाच्या पंख्यासारख्या घड्या घाल.
3. सगळ्यात वरच्या घडीवर शेजारी दिलं आहे त्यातलं एक चित्र काढ.
4. घड्या तशाच ठेवून चित्राच्या आऊटलाईनवरून कापून घे. जास्त घड्या असतील तर कापायला जड जाईल, त्यासाठी घरातल्या मोठ्यांची मदत घे.
5. आता घड्या उलगडल्या की हातात हात धरलेल्या मुलांची/मुलींची साखळी तयार झालेली दिसेल.





तुला आवडेल त्या रंगांनी या मुलामुलींना रंगव.

एक मुलगा आणि एक मुलगी एकआडएक येतील अशी साखळी करायची असेल तर काय युक्ती करशील? तुला सुचलं तर आम्हाला फोटो/व्हिडिओ नक्की पाठव.



मुखपृष्ठ : सानिका देशपांडे

आतील मांडणी : OneZeroEight Brandcomm Pvt Ltd.

मुद्रितशोधन : वैशाली कार्लेकर, जुई चितळे

Editor : Dr. Shruti Panse

Language: Marathi, English


Published by :
Amruta Govind Kabade,
OneZeroEight Learning Pvt Ltd.
Flat No. 10, Narayan Complex,
2nd Floor, Hingne Kh.,
Sinhagad Road, Pune 411 051

Place of Publication :
Flat No. 10, Narayan Complex, 2nd Floor,
Hingne Kh., Sinhagad Road, Pune 411 051

Printed by : Atharva Print Creation
S. No. 91/1, Plot No. 8,
Tulshibaugwale Colony,
Sahakarnagar, Pune 411 009

For subscription:
Visit www.chikupiku.com Or
call on 9172136478

बोटांना बोटं जुळवून तुला असं करता येईल का?



RNI TC NO.: MAHBIL/2019/78568,
Declaration No.: SDM/Haveli/SR/59/2019, | Date of Publication: 01/03/2024